# द सनसेट क्लब

**खुशवंत सिंग**

अनुवाद

**मनीषा सोमण**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

The Sunset Club : Khushwant Singh
Marathi translation by Maneesha Soman
First published in English by Ravi Dayal Publisher & Penguin Books India 2010
Copyright © Khushwant Singh 2010
First published in Marathi by Riya Publications in arrangement with Penguin Books India.

**द सनसेट क्लब :** खुशवंत सिंग

अनुवाद : मनीषा सोमण

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
मनीषा सोमण
१५/४, कांचन गौरी, पंडित दीनदयाल रोड,
विष्णूनगर, सम्राट हॉटेलजवळ डोंबिवली (वेस्ट) ४२१२०२
मो. नं. : ९८२१२११२९७

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २००/-

# *मनोगत*

ही कादंबरी लिहिण्याचा माझा अजिबात विचार नव्हता. माझं वय ९५ वर्षांचं असल्याने मला खात्री नव्हती की ही कादंबरी मी पूर्ण करू शकेन किंवा नाही. काहीच करत नसल्याने मी अगदीच बेचैन झालो होतो. तेव्हा 'आऊटलुक' मासिकाच्या शीला रेड्डी यांनी मला सुचवलं की मी ज्यांच्याबद्दल खूप बोलतो त्या आता हयात नसलेल्या मित्रांच्या आठवणी लिहून काढाव्यात. मग कल्पना आकार घेऊ लागली आणि मी लिहायला बसलो. वास्तव आणि कल्पनांचा मेळ घातला.

माझ्या वाचकांना मी जे लिहिलंय ते कदाचित वाईट- सभ्य समाजासाठी अस्वीकारार्ह वाटेल. पण जे आहे ते असं आहे. नम्रता किंवा विनयशीलतेसाठी वगैरे मी कधीही प्रसिद्ध नव्हतो. जर तुम्हाला पुस्तकात काही अपमानास्पद आढळलं तर ते बाजूला काढून ठेवा.

पेंग्विन प्रकाशनाच्या संपादिका दिया कर हाजरा आणि नंदिनी मेहतांचा मी शतश: आभारी आहे, तसेच लछमन दार आणि राजिंदर गंजु, ज्यांनी माझ्या खरडलेल्या शब्दांना वाचनीय आकार दिला, त्यांचेही आभार मानेन.

✦✦✦

# अनुक्रमणिका


१. लोधी गार्डन ............................................ ७
२. फुलांचा महिना .......................................... ३३
३. वसंतानंतरचा ग्रीष्म ...................................... ४८
४. आणि आता एप्रिल आला ................................ ५९
५. बहावाचा मे महिना ....................................... ७७
६. उष्णतेनं पोळून काढणारा महिना ........................... ८५
७. मोराचा केकारव ........................................ ९४
८. समारंभाविना महिना ऑगस्ट ............................. १०३
९. उन्हाळा शरद ऋतूत बदलतो ............................. १०९
१०. गांधीमय ऑक्टोबर ...................................... ११४
११. गुरूंचा नोव्हेंबर .......................................... १२१
१२. निळ्या चंद्राचा डिसेंबर.................................... १२८
१३. सूर्यास्ताची घटिका ....................................... १५२


✦✦✦

# *लोधी गार्डन*

माझ्या कहाणीची सुरुवात झाली एका सोमवारच्या दुपारी. तो दिवस होता २६ जानेवारी २००९ भारतीय गणतंत्राचा ५९ वा स्थापना दिवस. ब्रिटिशांपासून आपल्याला जरी १५ ऑगस्ट १९४७ साली स्वातंत्र्य मिळालं असलं तरी आपल्या बुद्धिमान नेत्यांनी अतिशय हुशारीनं ठरवलं की ऑगस्ट महिन्याच्या मध्यात, इतक्या गरम आणि दमट हवामानात बाहेर उघड्यावर काही समारंभ करणं कठीण जाईल, त्यापेक्षा जानेवारीच्या शेवटी असा काही समारंभ करणं अधिक इष्ट! म्हणून त्यांनी २६ जानेवारी या दिवसाची निवड केली, ज्या दिवशी त्यांनी आपल्या देशाला नवीन संविधान दिले. या दिवशी राष्ट्रीय सुट्टी जाहीर करून या दिवसाचं गणतंत्र दिवस म्हणून नामकरणही केलं.

जानेवारीच्या शेवटी थंडीचा कडाका कमी होऊ लागलेला असतो; धुक्याचा पडदा वितळू लागल्याने सूर्याच्या सोनेरी किरणांनी सकाळ झळाळून उठू लागलेली असते; फुलांच्या बहारीचा, पाखरांच्या किलबिलाटाचा मोसम अगदी उंबरठ्याशी येऊन ठेपलेला असतो.

गणतंत्र दिन हा भारतासाठी सगळ्यात महत्त्वपूर्ण दिवस आहे. हा असा एकमेव दिवस आहे जो भारताच्या कानाकोपऱ्यात तेही - हिंदू-मुस्लीम-ख्रिश्चन-बुद्ध-शीख-जैन आणि पारशी सगळ्या जातीधर्माचे लोक मिळून साजरा करतात. प्रत्येक राज्याच्या राजधानीत झेंडावंदन केलं जातं, तसंच सेना, पोलीस आणि विद्यार्थ्यांची संचलने आयोजित केली जातात.

पण भारताच्या राजधानीत जो भव्य समारंभ होतो त्याची तुलना इतर कोणत्याच कार्यक्रमाशी करता येणार नाही. इथे भारतीय लष्कराचे सामर्थ्य तसेच सांस्कृतिक विविधतेचे प्रदर्शन केले जाते. रणगाडे, सशस्त्र गाड्या आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपक जात असतात; तोफा धडधडत असतात; भूदल, नौदल आणि हवाई दलाची एकत्रित पथके त्यांच्या तलवारी खाली करून सलामी संचलन करत असतात; घोडेस्वार आणि उंटस्वाराच्या पलटणीच्या पाठोपाठ विविध राज्यांतील

यशोगाथा सांगणारे रथ लोकनृत्याची झलक दाखवत जात असतात. हे दृश्य बघण्यासाठी राजपथाच्या दोन्ही बाजूला लोक पहाटेपासूनच गर्दी करू लागतात. ही भव्य यात्रा राष्ट्रपती भवनापासून सुरू होऊन रायसिना हिलवरून, सेक्रेटरीएटच्या भव्य इमारतीच्या नॉर्थ आणि साऊथ ब्लॉक्सच्या मधून निघून इंडिया गेट या सुप्रसिद्ध युद्ध स्मारकापर्यंत पोहोचते. पहिल्या महायुद्धात, १९१९ सालच्या तिसऱ्या अफगाण युद्धात आणि १९७१ साली पाकिस्तानबरोबर झालेल्या युद्धात धारातीर्थी पडलेल्या भारतीय जवानांची नावे इंडिया गेटवर लिहिलेली आहेत. इंडिया गेटच्या मधोमध मायभूमीसाठी प्राण वेचलेल्या शहीदांच्या स्मरणार्थ अमर ज्योत निरंतर तेवत असते.

तुम्हाला कदाचित प्रश्न पडेल की शांती आणि अहिंसेचा प्रेषित म्हणून अभिमानाने जगभर ओळखल्या जाणाऱ्या या गांधीजींच्या भूमीच्या राष्ट्रीय दिवशी संहारक शस्त्रास्त्र आणि युद्धशक्तीचं प्रदर्शन कशासाठी? कारण वास्तविकता वेगळीच आहे. आपण भारतीय परस्परविरोधी विधाने करण्यात पटाईत आहोत. आपण जगाला शांतीचं महत्त्व शिकवतो आणि स्वत: युद्धाची तयारी करतो. आपण मनाचं पावित्र्य, शुद्ध आचरण आणि ब्रह्मचर्याच्या महतीचे गुणगान गातो; पण आपल्याला वैषयिक भावनेने देखील पछाडलेले आहे. हेच तर आपलं वैशिष्ट्य आहे. इतकंच नाही तर, शस्त्रास्त्रांचं अशा प्रकारे जे काही प्रदर्शन मांडतो ना त्यावर पडदा टाकण्यासाठी म्हणून सेक्रेटेरियेट इमारतीच्या समोरच्या विजय चौकात 'बिटींग रिट्रीट' समारंभाचंही आयोजन करतो. ज्यात भूदल, नौसेना आणि वायुसेनेची बँड पथकं शस्त्र घेऊन नाही तर तुतारी, बासरी, क्लॅरिनेट् (बासरीसारखे लहान वाद्य), ढोल आणि बॅगपाईप्स (पंचवेणूवाद्य) यासारखी वाद्य वाजवत चौकात संचलन करतात. या कार्यक्रमाची सांगता गांधीजीच्या आवडत्या 'अबाईड विथ मी' या ख्रिश्चनांच्या भजनाच्या सुरावटीने होते. त्यानंतरच्या दिवशी म्हणजे ३० जानेवारीला, ज्या दिवशी आपण गांधींजीचा खून केला, त्यांच्यावर जिथे अंत्यसंस्कार केला त्या राजघाटावर जमून आपले नेते त्यांच्या काळ्या संगमरवरातील स्मारकावर फुले वाहतात. असे आहोत आपण आणि म्हणूनच आपण वेगळे आहोत.

असो, मी माझ्या कहाणीकडे वळतो. दुपारच्या सुमारास राजपथावरील संचलन संपतं आणि गर्दी पांगू लागते. हिरवळीवर गप्पागोष्टी करून, डुलकी

काढण्यासाठी म्हणून काहीजण जवळच्याच पुराना किल्ल्यात जातात. जवळपास अशी आणखीही काही प्राचीन ठिकाणं आहेत जिथे अशी जागा आणि शांतता मिळू शकते. त्यातलं सगळ्यात लोकप्रिय ठिकाण म्हणजे लोधी गार्डन. राजपथापासून चालत जाण्याच्या अंतरावर असणाऱ्या लोधी गार्डनमध्ये विविध प्रकारचे वृक्ष आहेत, पक्ष्यांचा किलबिलाट असतो आणि मध्ययुगीन स्मारके आहेत. हे भारतातील बहुधा सगळ्यात जास्त निसर्गरम्य ऐतिहासिक उद्यान असावे. कोणे एकेकाळी खैरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या खेडेगावात कबरी आणि मशिदी विखुरलेल्या होत्या. १९३० साली या गावातून गावकरी बाहेर पडले आणि या स्मारकांना शासनाचे संरक्षण मिळाले.

त्या वेळची व्हॉईसरॉयची पत्नी लेडी विलिंग्टन हिने आपले नाव पुढच्या पिढ्यांनाही माहिती व्हावे या महत्त्वाकांक्षेपोटी विखुरलेल्या स्मारकांभोवती भिंत बांधली, उत्तरेच्या दिशेला प्रवेशद्वार बांधलं आणि त्यावर 'लेडी विलिंग्टन पार्क' असं नाव खोदून घेतलं. साहेब आणि त्यांच्या मेमना घोड्यावरून रपेट करण्यासाठी तिने मार्गिकाही तयार करवून घेतली. आता ते सगळं इतिहासजमा झालंय. या उद्यानाला आता कोणीही 'लेडी विलिंग्टन पार्क' म्हणून ओळखत नाही, घोड्यावरून रपेट करण्यासाठी बांधलेल्या मार्गिकेचा आता दगडी फुटपाथ झाला आहे. इथे असणारी बहुतांश स्मारके लोधी राजवटीच्या काळात बांधली गेली असल्याने आता हे उद्यान 'लोधी गार्डन' म्हणून ओळखलं जातं. आता इथे आणखी तीन प्रवेशद्वारे आहेत. दुसऱ्या उत्तरेकडच्या प्रवेशद्वाराजवळ छोटे कार पार्किंग आहे. आठपुला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दगडी पुलावरून खंदक पार करून, जिथे १५१८ साली बांधलेल्या सिकंदर लोधीच्या कबरीच्या भोवताली बांधलेली भिंत होती, त्या दोन्ही बाजूंना मौलश्रीची झाडं असणाऱ्या सुंदर मार्गिकेतूनही उद्यानात पोहोचता येतं. इंडियन इंटरनॅशनल सेंटरच्या बाजूने पूर्वेकडे अजून एक प्रवेशद्वार आहे आणि आणखी एका दक्षिणेकडच्या प्रवेशद्वारातून दोन्ही बाजूला पाम ट्रीज् असणाऱ्या मार्गिकेतून थेट १४५० साली मुहम्मद शहा सय्यद यांनी बांधलेल्या सगळ्यात जुन्या मशिदीपर्यंत जाता येतं.

बगीच्यातला दक्षिणेकडच्या बाजूला असणारा विस्तीर्ण हिरवळीचा भाग अतिशय लोकप्रिय असण्याची अनेक कारणं आहेत, तिथे १४९४ साली बांधलेली जामा मशीद हेही त्यातलं एक! युवतीच्या स्तनासारखा तंतोतंत आकार असणारा

घुमट हे या मशिदीच्या लोकप्रियतेमागचं मुख्य कारण आहे. बहुतेक सगळ्याच छोट्या-मोठ्या मशिदींवर घुमट असतोच पण त्यावर लोखंडी सुळका असतो ज्यामुळे त्यातलं स्त्रीत्वाचं आकर्षण नष्ट होतं. पण बडा घुमटचं असं नाही. बडा घुमट नीट न्याहाळून बघितल्यावर युवतीच्या स्तनाची आठवण करून देणारं साम्य बघून आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. तुमच्या हेही लक्षात येईल की हिरवळीवर बसलेले पुरुष बडा घुमटकडे तोंड करून बसलेले असतात तर त्यांच्याबरोबर असणाऱ्या स्त्रिया पाठ करून बसलेल्या दिसतील. बडा घुमटच्या समोर बसण्यासाठी बाक आहे. बगीच्यात नेहमी येणारे लोक याला 'बूढा बेन्च' म्हणून ओळखतात, कारण गेली अनेक वर्षं तीन वृद्ध गृहस्थ लटपटत्या पायाने बागेत चक्कर मारून याच बाकावर येऊन बसतात. आपापसात गप्पा मारत असताना त्यांची नजर मात्र बडा घुमटवर खिळलेली असते. इंग्रजी बोलणाऱ्या भारतीयांनी त्याचं 'सनसेट क्लब' असं नामकरणही केलंय. कारण या बाकावर बसणारे हे तीन गृहस्थ रोज संध्याकाळच्या वेळी इथे बसलेले असतात. हे तिघेही ऐंशीच्या घरातले आहेत- त्यांच्या आयुष्याच्या संध्याकाळच्या वयात!

'सनसेट क्लब'च्या सभासदांची ओळख करून देतो. हे या तिघातले सगळ्यात मोठे म्हणून त्यांची आधी ओळख करून देतो, हे आहेत पंडित प्रीतम शर्मा. हे पंजाबी ब्राह्मण गृहस्थ ऑक्सफर्डचे ग्रॅज्युएट असून त्यांनी सांस्कृतिक सल्लागार म्हणून लंडन आणि पॅरिसमध्ये काम केलं आहे आणि शिक्षण मंत्रालयातून उच्चपदस्थ अधिकारी म्हणून ते निवृत्त झाले. ते तब्येत सांभाळून होते. समोरून जरी त्यांना टक्कल पडलं असलं तरी मागच्या बाजूला पिकलेले का होईना पण खांद्यावर रुळतील इतके केस होते. यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विद्वत्ता उठून दिसत असे. त्यांची तब्येत जरी चांगली असली तरी त्यांना वाचायला चष्मा लागतो, ऐकायला कानात यंत्र घालावं लागतं आणि खाण्यासाठी तोंडात कवळी बसवावी लागते. त्यांचा आयुर्वेद आणि होमिओपॅथीवर विश्वास आहे. त्यांच्या आयुष्यात अनेक देशी-विदेशी स्त्रिया आल्या आणि गेल्या, पण त्यातल्या एकीशीही लग्न करण्याचा मात्र योग जुळून आला नाही. ते त्यांच्यापेक्षा वीस वर्षांनी लहान असणाऱ्या आणि एका सामाजिक संस्थेबरोबर काम करणाऱ्या अविवाहित बहीण सुनितासह राहतात. खान मार्केटजवळ असणाऱ्या एका